महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २२५ वे | दिनांक : १०/०८/२०२६ | वार : सोमवार

## अतुल बेनकेंचा सत्ताधाऱ्यांना घरचा आहेर: 'सरकार ऐकत नसेल, तर सत्ता काय कामाची?'



**पुणे :** जुन्नर तालुक्यातील रेल्वेच्या प्रलंबित प्रश्नावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार अतुल बेनके यांनी आपल्याच सत्तेतील पक्षाला कडक शब्दांत घरचा आहेर दिला आहे. सत्तेत असूनही सरकार जनतेचे ऐकत नसेल तर ही सत्ता काय कामाची? असा संतप्त सवाल करत, सत्ता कोणाची आहे यापेक्षा जनतेची मागणी अधिक महत्त्वाची असल्याची ठाम भूमिका त्यांनी मांडली आहे. तसेच याप्रसंगी जुन्नरच्या रेल्वेचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची आग्रही मागणीही बेनके यांनी केली आहे.

नारायणगाव येथे विविध पक्षांचे नेते आणि नागरिकांनी एकत्र येत केलेल्या आंदोलनादरम्यान, 'जुन्नर तालुक्यात रेल्वेलाईन झालीच पाहिजे, यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी समन्वयाने आणि एकजुटीने पाठपुरावा करावा,' असे स्पष्ट करत अतुल बेनके यांनी स्वपक्षालाच घरचा आहेर दिला. यावेळी सरकारच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करताना त्यांनी, मी ज्या पक्षात काम करतो तो पक्ष सध्या सत्तेत आहे, पण सत्तेत असूनही सरकार लोकप्रतिनिधींच्या मागण्या ऐकत नसेल, तर ही सत्ता काय कामाची? असा थेट सवाल उपस्थित केला.

नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मूळ मार्ग पूर्ववत करावा, या मागणीसाठी 9 ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून ठिकठिकाणी तीव्र चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सिन्नर तालुक्यातील गोंदे फाटा येथे समृद्धी महामार्गाजवळ आमदार सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनादरम्यान पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार झटापट झाली. आक्रमक झालेल्या आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर करत आमदार सत्यजीत तांबे यांना ताब्यात घेतले. नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मूळ मार्ग पूर्ववत करावा, या मागणीसाठी ९ ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून ठिकठिकाणी तीव्र चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सिन्नर तालुक्यातील गोंदे फाटा येथे समृद्धी महामार्गाजवळ आमदार सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनादरम्यान पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार झटापट झाली. आक्रमक झालेल्या आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर करत आमदार सत्यजीत तांबे यांना ताब्यात घेतले; मात्र त्यानंतरही संतप्त आंदोलकांनी समृद्धी महामार्गावर चक्काजाम करण्याचा प्रयत्न केला.

सुमारे 16 हजार कोटी रुपयांच्या या पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वे प्रकल्पामुळे जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथील जागतिक दर्जाच्या 'जीएमआरटी' (GMRT) दुर्बिणीला धोका निर्माण होत असल्याचे कारण देत रेल्वे मंत्रालयाने मूळ मार्ग बदलण्याचा निर्णय घेतला आहे. परिणामी, पुणे—चाकण—राजगुरुनगर—मंचर—नारायणगाव—आळेफाटा—संगमनेर—सिन्नर—नाशिक हा मूळ मार्ग रद्द करून नाशिक-शिर्डी-पुणतांबा आणि अहिल्यानगर-चाकण अशा पर्यायी मार्गांचे नव्याने सर्वेक्षण करण्यात आले आहे. रेल्वे मंत्रालयाच्या या निर्णयामुळे खेड, आंबेगाव, जुन्नर, संगमनेर आणि सिन्नर परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून, त्यातूनच हे आंदोलन उभे राहिले आहे.

नाशिक-पुणे हायस्पीड रेल्वे प्रकल्पाचा मूळ मार्ग पूर्ववत करावा, या मागणीसाठी 9 ऑगस्ट क्रांती दिनाचे औचित्य साधून ठिकठिकाणी तीव्र चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सिन्नर तालुक्यातील गोंदे फाटा येथे समृद्धी महामार्गाजवळ आमदार सत्यजीत तांबे यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनादरम्यान पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार झटापट झाली. आक्रमक झालेल्या आंदोलकांना रोखण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर करत आमदार सत्यजीत तांबे यांना ताब्यात घेतले. मात्र त्यानंतरही संतप्त आंदोलकांनी समृद्धी महामार्गावर चक्काजाम करण्याचा प्रयत्न केला.

## बेकायदेशीर वाळू माफियांना उत्खननावर १० पट दंड



**मुंबई :** राज्यात वाळू, दगड आणि इतर गौण खनिजांचे बेकायदेशीर उत्खनन, वाहतूक तसेच विल्हेवाट लावणाऱ्यांविरोधात राज्य सरकारने दंडात्मक कारवाईचे नियम पूर्णपणे बदलले आहेत. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या आदेशानुसार महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, 2026' (अध्यादेश क्र. 11) जारी केला आहे.

या अध्यादेशानुसार 1966 च्या मूळ जमीन महसूल संहितेतील कलम 48 (7) मध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आली असून, हा अध्यादेश 7 ऑगस्ट 2026 पासून राज्यभरात तातडीने लागू करण्यात आला आहे. नवीन नियमांनुसार, आता बेकायदेशीर उत्खनन किंवा वाहतुकीवर खनिजाच्या 'बाजार मूल्याच्या 5 पट'ऐवजी, देय असलेल्या 'स्वामित्वशुल्काच्या (रॉयल्टी) 10 पट' शास्ती (दंड) आकारली जाणार आहे.

राज्यात एकसमान दंड पद्धती: यापूर्वी दंडाची रक्कम ही जिल्हाधिकाऱ्यांनी ठरवलेल्या बाजार मूल्यावर आधारित असल्याने जिल्ह्यानुसार दंडाच्या रकमेत मोठी असमानता होती. आता संपूर्ण राज्यात रॉयल्टीच्या आधारावर पारदर्शक आणि एकसमान पद्धतीने दंडाची गणना होईल.

पायाभूत विकास प्रकल्पांना दिलासा: बाजार मूल्यावर आधारित दंड अवाढव्य असल्याने अनेकदा दंडाची रक्कम मूळ प्रकल्पाच्या खर्चापेक्षाही जास्त होत होती, ज्यामुळे महत्त्वाचे विकास प्रकल्प ठप्प पडत होते. नव्या नियमामुळे या प्रकल्पांना मोठा दिलासा मिळणार आहे.

प्रलंबित याचिका आणि महसूल वसुली: जास्त दंडामुळे न्यायालयात तसेच वरिष्ठ प्राधिकरणांकडे मोठ्या प्रमाणात अपिले दाखल होऊन शासनाचा महसूल अडकून पडत होता. आता वाजवी दंड पद्धतीमुळे कायदेशीर अडचणी कमी होऊन महसूल वसुलीला गती मिळेल.

जुनी आणि नवी दंडात्मक तरतूद

पूर्वीची तरतूद: उत्खनित खनिजाच्या बाजार मूल्याच्या 5 पट दंडाची आकारणी.

नवा सुधारित नियम: बाजार मूल्याऐवजी संबंधित खनिजाच्या स्वामित्वशुल्काच्या (रॉयल्टी) 10 पट शास्ती (दंड).

## दूध, खाद्यतेलांप्रमाणे मद्यात भेसळ खपवून घेणार नाही

**पुणे :** खाद्यपदार्थांप्रमाणेच मद्य आणि मद्यार्क नसलेल्या पेयांमध्ये भेसळीच्या तक्रारी वाढल्या असून, गावठी दारूमध्ये विषारी रसायन मिसळल्याने मृत्यू झाल्याच्या घटना पुण्यात घडल्या आहेत. पेयजलांची गुणवत्ता, त्याचे उत्पादन आणि लेबलिंग यावर आमचे बारकाईने लक्ष आहे. दूध, पनीर, खाद्यतेलांप्रमाणेच "अल्कोहोलिक' आणि "नॉन अल्कोहोलिक' पेयांचीही तपासणी करणार असून, खानपानाच्या गुणवत्तेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही,' असा खरमरीत इशारा अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी शनिवारी दिला. प्रत्येक तरुणाने स्वत:ची स्वप्ने, सद्विवेक आणि अंतरात्म्याला फॉलो केले पाहिजे. केवळ प्रवाहासमवेत न वाहता समाजात सकारात्मक बदल घडविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत, अशा प्रेरक शब्दांत त्यांनी "जेन झी' पिढीला "बी युवरसेल्फ'चा मंत्र दिला. पुणे लोकल आणि माय जनसेवक यांच्या संयुक्त विद्यमाने बालगंधर्व रंगमंदिरात आयोजित "भविष्यवेध - संवाद भविष्याचा' या उपक्रमांतर्गत "अनस्टॉपेबल तुकाराम' या विशेष मुलाखत कार्यक्रमात ते बोलत होते. प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप आणि वरिष्ठ पत्रकार प्रशांत आहेर यांनी मुंढे यांची मुलाखत घेतली. तुकाराम मुंढे यांचे वरिष्ठ बंधु अशोक मुंढे, विश्वेश्वर बँकेचे अध्यक्ष सुनील गाडवे, वी फाउंडेशनच्या शामला देसाई, आम्रपाली चव्हाण, दिनेश कदम आदी उपस्थित होते. याप्रसंगी त्यांनी आपल्या बालपणापासूनचा खडतर प्रवास, यूपीएससीतील अपयश आणि यश, प्रशासकीय कारकीर्दीतील कठोर निर्णय आणि अन्न सुरक्षेशी संबंधित धोरणांवर मनमोकळे भाष्य केले.

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० ऑगस्ट २०२६


## डॉ. शिवाजी शिंदे यांना 'बेस्ट अचीवर अवॉर्ड'; सामाजिक क्षेत्रातील योगदानाला राष्ट्रीय प्रतिष्ठा




**मुरूम (प्रतिनिधी) :** सामाजिक कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय व निस्वार्थ कामगिरी केल्याबद्दल, उमरगा तालुक्यातील मुरूम येथील सामाजिक कार्यकर्ते तथा भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालयाचे सेवानिवृत्त प्रादेशिक व्यवस्थापक डॉ. शिवाजी शिंदे यांना राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित 'बेस्ट अचीवर अवॉर्ड' प्रदान करण्यात आला आहे. नवी दिल्ली येथे नुकताच पार पडलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या विशेष सोहळ्यात हरियाणा लँड रेक्लमेशन अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे (HLRDC) चेअरमन गुरनाम सैनी, भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता तथा चेअरमन डॉ. राम अवतार शर्मा, इंटरनॅशनल वेल्फेअर ह्यूमन राइट्स फाऊंडेशनचे डॉ. राजिंदर सैनी आणि मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड्सचे चेअरमन तथा आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. सी. पी. यादव यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. डॉ. शिंदे यांना या मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, गौरवपत्र आणि सन्मानपदक (मेडल) प्रदान करून गौरविण्यात आले.डॉ. शिवाजी शिंदे हे गेल्या अनेक वर्षांपासून मुरूम, उमरगा परिसर तसेच संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. अत्यंत सामान्य परिस्थितीतून संघर्ष करत उच्च पदापर्यंत पोहोचल्यानंतरही त्यांनी आपले सामाजिक भान जपले आहे.समाजातील वंचित, गरीब, अनाथ आणि संकटग्रस्त घटकांना त्यांनी नेहमीच मदतीचा हात दिला आहे.नैसर्गिक आपत्तीच्या काळात किंवा वैयक्तिक अडचणीत सापडलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी ते सातत्याने अग्रेसर असतात.त्यांच्या याच निस्वार्थ आणि अविरत लोकसेवेची दखल घेऊन त्यांना या राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.धाराशिव जिल्ह्यात आनंदाचे वातावरणडॉ. शिवाजी शिंदे यांना मिळालेला हा राष्ट्रीय पुरस्कार केवळ त्यांच्या वैयक्तिक कार्याचा गौरव नसून, ग्रामीण भागात प्रामाणिकपणे झटणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याचा सन्मान असल्याची भावना स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे. या यशाबद्दल मुरूम शहरासह संपूर्ण धाराशिव जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, परिसरातील तरुण पिढीला यामुळे मोठी सामाजिक प्रेरणा मिळणार आहे.त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल राजकीय, सामाजिक, प्रशासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवरांकडून डॉ. शिवाजी शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## तिफण ट्रेकिंग ग्रुपची छत्रपती संभाजीनगरच्या 'वन ट्री लेक'ला भेट



**छत्रपती संभाजीनगर :** आज तिफण ट्रेकिंग ग्रुपने नेहमीप्रमाणे वन ट्री लेकला भेट दिली.( ता. ९ )पण यावेळी सगळ्यांच्या चेहऱ्यावर आनंदापेक्षा हळहळ होती. कारण डोंगर माथ्यावर आमचा लाडका 'वन ट्री' अर्धवट तुटलेल्या अवस्थेत दिसला. कुणीतरी हे झाड तोडून टाकले आहे. . ते आता बुंध्यावर तोलून उभे आहे. ग्रुपमधील सदस्याने खंत व्यक्त केली.
"हे झाड कुणीतरी तोडले. इथे आम्ही कायम जायचो. अनेक आठवणी आहेत याच्याशी जोडलेल्या. पावसात, उन्हात, थंडीत... हा वृक्ष आमच्या ट्रेकचा साक्षीदार होता.“ हिरव्या परिसरात एकटा उभा असलेला हा वृक्ष गेल्या कित्येक वर्षांपासून ट्रेकर्स, फोटोग्राफर्स आणि निसर्गप्रेमींसाठी ओळखीचा होता. आज त्याची ही अवस्था बघून सगळ्यांनाच वाईट वाटले. तिफण ट्रेकिंग ग्रुपने यानिमित्ताने निसर्ग आणि सार्वजनिक मालमत्तेच्या रक्षणाचा संदेश दिला. झाडे तोडण्याआधी एकदा विचार करावा, कारण त्याच्याशी अनेकांच्या भावना आणि आठवणी जोडलेल्या असतात. निसर्गाला इजा न करता त्याचा आनंद घेऊया. हाच खरा ट्रेकिंगचा उद्देश आहे. यावेळी डॉ. शिवाजी हुसे, विलास कापडे, प्रभाकर मुंडे, हरिदास पाले, सोमनाथ ताठे, उर्मिला हुसे, वैशाली कापडे, योगेश्वरी मुंडे, कल्पना पाले, प्रतिभा ताठे, आदींची उपस्थिती होती.

## ‘ज्ञानाबरोबरच, कौशल्यातून स्वावलंबी व्हा!’



**जालना :** विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्ये विकसित व्हावीत, त्यांची सर्जनशीलता वाढीस लागावी आणि त्यांच्यात स्वावलंबनाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात ‘केक बनविण्याचे प्रात्यक्षिक व पाककला प्रशिक्षण’ उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत केक बनविण्याच्या विविध कला आत्मसात केल्या.यावेळी पुजा तिडके यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले. केक तयार करण्यासाठी लागणारे साहित्य, त्याचे अचूक मोजमाप व प्रमाण याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. मैदा, साखर, दूध, बटर, बेकिंग पावडर, बेकिंग सोडा, व्हॅनिला इसेन्स व कोको पावडरचा योग्य वापर करून बेकिंग केक, चॉकलेट केक आणि पायनॅपल केक कसे तयार करावेत, याचे प्रत्यक्ष धडे विद्यार्थ्यांना देण्यात आले.विद्यार्थ्यांनी स्वतः केकचे मिश्रण तयार करण्यापासून ते बेकिंग आणि आकर्षक डेकोरेशन (सजावट) करण्यापर्यंतची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना पाककलेच्या ज्ञानासोबतच वेळेचे नियोजन, स्वच्छता, अचूकता आणि सांघिक भावना (टीमवर्क) याचे महत्त्व समजले. “केक बनविण्याचे हे कौशल्य विद्यार्थ्यांना भविष्यात लघुउद्योग, घरगुती व्यवसाय किंवा स्वयंरोजगारासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकते. असे डॉ. कविता प्राशर यांनी सांगितले प्रात्यक्षिकानंतर विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या स्वादिष्ट केकचा आस्वाद घेत आनंद व्यक्त केला. ‘शिकत शिकत कमवा आणि कौशल्यातून स्वावलंबी व्हा’ हा महत्त्वपूर्ण संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरला.या प्रसंगी प्रा. रूपाली तिडके, डॉ. मोहिनी रायबागकर, डॉ. आशा पांडे, प्रा. निधी शुक्ला, डॉ. मंगल मुळे, डॉ. चंद्रकांत धोत्रे, प्रा. अभिषेक ढेंबरे, प्रा. प्रमोद अवचार, प्रा. सुधीर देशपांडे, डॉ. कुणाल देशपांडे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० ऑगस्ट २०२६


## छत्रीताई

छत्रीताई छत्रीताई
पावसाने केली घाई
तू जवळ असली की
मुळीच चिंता नाही

छत्रीताई छत्रीताई
काळा काळा तुझा रंग
सर्दी पडसे होत नाही
भिजले तरी तुझे अंग

छत्रीताई छत्रीताई
डोक्यावर तुझ्या शेंडा
हाती तुला धरण्यासाठी
खाली वाकडा दांडा

छत्रीताई छत्रीताई
आकाराने तू गोलच गोल
पाऊस सुरू झाला की
वाटते तुझे मोल

छत्रीताई छत्रीताई
पावसामध्ये तुझेच राज्य
आमचे रक्षण करण्यासाठी
सदा असते सज्ज



- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

## मन माझे तीळ तीळ तुटते

तुला सोडून दूर जातांना,
भूतकाळ सर्व आठवतो.
तुझ्या सोबत जगलेले,
क्षण सारे पुन्हा साठवतो. १

तुझ्या पासून दूर जातांना,
मन माझे तीळ तीळ तुटते.
कसे सांगू मनाची घालमेल,
सखी संयम माझे गं सुटते. २

तुझ्या पासून दूर राहणे,
प्रिये जमणार नाही मला,
दु:खी मनाची अवस्था पुन्हा
कसे समजावून सांगू तुला. ३

तुझ्या डोळ्यातील काजळ,
आता मनास माझ्या छळते.
माझ्या हृदयातील दु:ख,
सांग आता कुणाला कळते. ४

तुझ्या पासून दूर जातांना,
विरह मनाला होतो खूप.
सखी तू सोबत असल्यावर,
आयुष्यात खुलेल माझे रूप. ५



नागेश बातवाड,
छत्रपती संभाजीनगर

# आंबेडकरी चळवळीतील कवी-गायकांची बदलती दिशा

वामन दादांचा काळ म्हणजे विचारांचा सुवर्णकाळ होता. त्या काळातले कलाकार, शाहिर, कवी आणि गायक हे फक्त गाणे गात नव्हते, तर ते विचार मांडत होते, प्रेरणा देत होते, लोकांना संघटित करत होते. शाहिर विजयानंद दादा जाधव, प्रतापसिंग दादा बोदडे यांसारख्या अनेक कलाकारांनी चळवळीच्या हितासाठी काम केलं. त्यांच्यात मतभेद नव्हते, कारण त्यांची ध्येय एकच होती — विचार आणि चळवळ जिवंत ठेवणे.पण आजच्या काळात परिस्थिती बदलली आहे. आजचे अनेक कवी-गायक हे स्वार्थ, प्रसिद्धीचा मोह, पैशाची भूक आणि सोशल मीडियाच्या चमकदार लाईटमध्ये अडकून पडले आहेत. त्यांनी आंबेडकरी गाणी म्हणजे “ट्रेंड” बनवून टाकली आहेत. विचारांचा, सत्याचा, चळवळीच्या दिशेचा विचार करण्याऐवजी, फक्त व्ह्यूज, फॉलोअर्स आणि रील्ससाठी गाणी तयार होत आहेत.गाण्यांमध्ये विचारांची ताकद कमी होत चालली आहे. काही गाण्यांमध्ये तर अंगप्रदर्शन, डान्स, आणि चमकदार म्युझिकच्या आड खरी चळवळ लपवली जात आहे. ज्या गाण्यांनी आधी लोकांना प्रेरित करायचं, त्याच गाण्यांचा आज मनोरंजनासाठी वापर होतोय.ही दिशा धोकादायक आहे, कारण विचार हरवले की चळवळ फक्त नावापुरती राहते. वामन दादांचा काळ आणि त्यांची पिढी हे दाखवून गेली की कलाकार जर विचाराशी प्रामाणिक राहिला, तर त्याचं गाणं काळाच्या पलीकडे जाऊन लोकांच्या हृदयात घर करतं. पण जर कलाकार फक्त स्वतःसाठी गात असेल, तर ते गाणं जास्तीत जास्त काही दिवस ट्रेंड होईल, पण इतिहासात जागा मिळणार नाही.आजची गरज आहे की कलाकारांनी पुन्हा एकदा त्या जुन्या पिढीकडून शिकावं. मतभेद, स्वार्थ, आणि प्रसिद्धीचा मोह बाजूला ठेवून एकत्र यावं. विचारांना, सत्याला, आणि चळवळीच्या उद्दिष्टाला पुन्हा केंद्रस्थानी आणावं. कारण गाणं केवळ सूर आणि ताल नसतं, तर ते एक शस्त्र असतं — अन्यायाविरुद्धच्या लढ्याचं, जनजागृतीचं, आणि परिवर्तनाचं.---



निलेश वाघमारे
मो नं- 7030858262

# निसर्ग कवी ना. धों. महानोर

मराठी निसर्ग कवी, गीतकार, ना. धों. महानोर यांचा जन्म दि.१६ सप्टेंबर १९४२रोजी पळसखेडा ता.कन्नड, जि.संभाजी नगर येथे शेतकरी कुटुंबात झाला. आई वडील दुसऱ्याच्या शेतात राबत असत. महानोरांना चार भाऊ आणि तीन बहिणी. ते सगळ्यांत थोरले. प्राथमिक शिक्षण पळसखेडला झाल्या नंतर वयाच्या दहाव्या वर्षी ते पुढील शिक्षणासाठी ८-१० किमी अंतरावर असलेल्या शेंदुर्णीच्या शाळेत दाखल झाले. शेंदुर्णीच्या शाळेतच कवितेशी त्यांची ओळख झाली. कवितेची गोडी लागली. शाळेत असताना शाळेच्या नाटका मधून त्यांनी कामंही केली. मॅट्रिक झाल्या नंतर ते जळगावच्या मूळजी जेठा महाविद्यालयात कला शाखेत दाखल झाले. या महाविद्यालयात म.ना. अदवंत, राजा महाजन अशा ‘साहित्यिक’ प्राध्यापकांकडून महानोरांना भरपूर प्रोत्साहन मिळालं, परंतु घरातल्या अडचणींमुळे वर्ष पूर्ण होण्याच्या आतच शिक्षण सोडून त्यांना गावी जाणं भाग पडलं. त्यांच्या वडिलांनी स्वत:ची पाच एकर कोरडवाहू जमीन विकत घेतली होती आणि शेतीच्या कामांसाठी वडिलांना त्यांची गरज होती. महानोरांचं शिक्षण थांबलं आणि ते शेतीत रमले. ना.धों. महानोर या रानकवीने मराठी साहित्यावर अवीट नाममुद्रा उमटवली आहे. त्यांच्या अद्भुत निसर्ग कवितांनी, त्यातल्या रंग गंधांनी, नदीच्या प्रवाहा सारख्या नाद-लयींनी वाचक रसिकांना वेड लावलं आहे. रानात राहणारा हा कवी निसर्गाची भाषा बोलतो, निसर्गाशी संवाद करतो, रसिकाचं बोट धरून त्याला निसर्गात घेऊन जातो. निसर्ग आणि स्त्री ही महानोरांच्या कवितेची केंद्रस्थानं आहेत. या कवितेत निसर्गाचे विविध गंध आहेत, विविध ध्वनी आहेत, निसर्गाच्या स्पर्शाने फुललेला व रोमांचित करणारा शृंगार आहे. या कवितेत मातीशी जडलेली नाती आहेत, त्यातल्या वेदना-संवेदना आहेत. महानोरांची उत्कट अभिव्यक्ती रोमँटिक भावनिक वळणाने जाते. महानोरांनी गद्य लेखनही भरपूर केलं आहे. ‘गांधारी’ ही कादंबरी; ‘गपसप’ व ‘गावाकडच्या गोष्टी’ हे लोककथांचे संग्रह; ‘ऐशी कळवळ्याची जाती’ हा व्यक्तिचित्रणात्मक ललित लेखांचा संग्रह असं विविधांगी ललित लेखन त्यांच्या नावावर आहे. याशिवाय यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार, शरद पवार आणि मी, आनंदयोगी पु.ल. या पुस्तका मधून त्यांनी महाराष्ट्रातील ही मोठी व्यक्तिमत्त्वं उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात, महानोरांचं पहिलं प्रेम कवितेवरच आहे. ‘रानातल्या कविता’ या त्यांच्या पहिल्याच कविता संग्रहाने मराठी कवितेत त्यांचं महत्त्वाचं स्थान निर्माण केलं. त्यांचे ११ कवितासंग्रह व ‘अजिंठा’ हे खंडकाव्य प्रकाशित आहे. ‘वही’ आणि ‘पळसखेडची गाणी’ हे त्यांच्या लोकगीतांचे संग्रह आहेत. त्यांनी चित्रपटा साठी गाणी लिहिली आहेत. ‘जैत रे जैत’ या चित्रपटात त्यांच्या कविताचं गाण्यांच्या रूपाने आविष्कृत झाल्या आहेत. महानोरांचं लोकसाहित्याबद्दल प्रचंड प्रेम व जिव्हाळा आहे. या प्रेमापोटी त्यांनी आपल्या भागातील लोकगीतं व लोककथा शोधून, एकत्रित करून संग्रहरूपाने त्यांचा परिचय महाराष्ट्राला घडवला आहे. यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. ‘वही’ हा मराठवाड्यात लोकप्रिय असलेला लोकगीतांचा प्रकार. महानोरांनी लिहिलेल्या ‘वह्या’ त्यांच्या ‘वही’ या संग्रहात आहेत. विलक्षण लयकारी लाभलेल्या या कवीने मुक्तछंदही भरपूर लिहिला आहे. ‘प्रार्थना दयाघना’ मुक्तछंदात आहे, ‘अजिंठा’तली गिल पारूची कथा मुख्यत्वाने मुक्तछंदात आहे आणि ‘तिची कहाणी’ सुद्धा. महानोरांच्या कवितेचे असे विविध पैलू आहेत. १९७८ साली ते महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य झाले. मराठी साहित्य परिषदेच्या वतीने पुण्यात झालेल्या पहिल्या पर्यावरणप्रेमी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. इतकेच नाही तर दशदिवसीय ई-साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते. पुणे येथे ३ ऑगस्ट२०२३ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त भावपूर्ण आदरांजली.

प्रा डॉ राजेंद्र सोनवणे
जेइएस महाविद्यालय जालना.

# लेखक अय्युब पठाण यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

छत्रपती संभाजीनगर :- (प्रतिनिधी) इयत्ता चौथीच्या बालभारतीतील " कौतुकाची थाप " या पाठाचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी संभाजीनगर जिल्ह्यातील दहा शाळेमधील सुमारे तीन विद्यार्थी आणि तीनशे शिक्षकांशी प्रत्यक्ष संवाद साधला. संभाजीनगर जिल्ह्यातील शाळेमध्ये आयोजित या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची आवड निर्माण करणे आणि भविष्यात लेखक- कवी घडविणे हा उद्देश होता. शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या पुढाकारातून हा नाविन्यपूर्ण उपक्रम घेण्यात आला आहे. स्वतः शिक्षक आमदार प्रत्येक शाळेच्या कार्यक्रमात प्रत्यक्ष हजर होते. कवी मनोज खुटे यांच्या सुपीक संकल्पनेतून " लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला " हा उपक्रम राबविण्यात आला आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० ऑगस्ट २०२६


# शिक्षणाच्या बाबतीत, सरकार असो वा विरोधक, कुणीच तरुणांच्या डोळयांत डोळे घालून बोलू शकत नाही



२० जुलैला काय घडले हे सांगायला कोणत्याही सामाजिक शास्त्रज्ञाची गरज नाही. तो निव्वळ विरोध नव्हता, तर लोकांच्या संतापाचा उद्रेक होता. या दबावामुळे सरकारला अगदी नाइलाजाने माघार घ्यावी लागली. राजीनामा दिलेल्या मंत्र्याचे ज्या प्रकारे स्वागत झाले, त्यावरूनच आंदोलनाबाबतचा अनादर दिसून आला. एकीकडे सरकार नमले, तर दुसरीकडे सत्ताधारी समर्थक या उद्रेकामागे कट-कारस्थान आणि 'परकीय हात' असल्याचा प्रचार करण्यात व्यस्त झाले. 'कॉकरोच जनता पार्टी' ही कोणाच्या हातातील साधन आहे का, आंदोलनाचा ताबा भलत्यांनीच घेतला का, किंवा पंतप्रधानांच्या इन्स्टाग्राम संदेशाला किती व्ह्यूज मिळाले, या गप्पा वृत्तपत्रांच्या कोपऱ्यात छापण्यापुरत्याच ठीक आहेत. या आंदोलनाचा खरा पैलू म्हणजे अभिजीत दीपकेच्या पहिल्या पोस्टपासून सुरू झालेली अनपेक्षित, उत्स्फूर्त लाट. या मूळ मुद्याचा विचार करण्याऐवजी सरकार केवळ नुकसान टाळण्यात आणि 'गुप्तचर यंत्रणेचे अपयश' असल्याच्या गप्पा मारण्यात गुंतले आहे. जेव्हा तुम्ही स्वतःच्या कौतुकाव्यतिरिक्त बाकी सर्व आवाज दाबता, तेव्हा असे अपयश येणारच. तसेच, सध्या जनमताचा कोणताही विश्वासार्ह डेटा उपलब्ध नाही. एक तर समाजात कमालीची कटुता असताना सर्वेक्षणातील आकडे दिशाभूल करणारे असतात; आणि दुसरे म्हणजे, २०१४ नंतर सरकारने स्वतंत्र संस्थांना जनमत गोळा करण्यापासून रोखल्यामुळे 'सर्व काही आलबेल आहे' असा भास निर्माण केला गेला आहे. त्यामुळेच आंदोलनाचा वेग आणि तीव्रता पाहून सगळेच अवाक झाले. सरकारधार्जिणी माध्यमे अजूनही आंदोलकांचा गैरव्यवहार आणि कचऱ्याच्या बातम्या दाखवण्यात व्यस्त आहेत, पण या आंदोलनाने राजकारणावर पाडलेला खरा प्रभाव त्यांच्या खिजगणतीतही नाही. दुर्दैवाने, सरकार या संकेतांकडे डोळेझाक करत आहे. गेल्या महिनाभरात तापलेल्या या आंदोलनाने तीन मोठे मुद्दे अधोरेखित केले आहेत. पहिले म्हणजे, हे आंदोलन 'नीट' परीक्षा आणि पेपरफुटीवरून पेटले असले, तरी प्रश्न तेवढाच नव्हता. सरकारने नेहमीप्रमाणे केवळ परीक्षा घेण्याच्या तंत्रज्ञानात बदल करून उत्तर दिले. परीक्षांचे पेपर पोहोचवण्यासाठी आधी हवाई दलाची मदत घ्यावी लागणे, हेच व्यवस्थेच्या वैचारिक अपयशाचे लक्षण होते. आता पेपरफुटी रोखण्यासाठी समिती नेमून पुन्हा तोच मार्ग निवडला जात आहे. आपण परीक्षा व्यवस्थेचा बट्ट्याबोळ केला आहे, हे खरे; पण याचे मूळ केवळ फसवणुकीत नाही, तर आपल्या शिक्षण पद्धतीतच आहे. तरुणांसाठी वेळ घालवण्याचे साधन बनलेली ही निरर्थक व्यवस्थाच मुख्य आजार आहे. यामुळेच परीक्षेचे निकाल आणि कोचिंग क्लासेसच्या धंद्याला अतोनात महत्त्व आले आहे. शिक्षण पद्धतीच्या नावाखाली तरुणांची वर्षे वाया घालवण्याचे स्पष्टीकरण सरकार किंवा विरोधक यांपैकी कुणीच देऊ शकत नाही. दुसरे म्हणजे, या आंदोलनातून आणि त्यातील ऊर्जेतून तरुणांसमोरील आयुष्याची घोर निरर्थकता समोर आली आहे. हा मुद्दा केवळ नोकरी मिळण्यापुरता मर्यादित नसून, अनिश्चित भविष्याशी जोडलेला आहे. एखाद्या उद्योजकाला सवलती देऊन 'इतक्या नोकऱ्या निर्माण करू' असे केवळ आकडे दाखवून या समस्येवर मात करता येणार नाही. एकूणच जीवनशैली आणि भारतीय समाजात असलेली विषमता यांमुळेच भविष्याबद्दलची अनिश्चितता अधिक वाढली आहे. पूर्वीच्या अर्थव्यवस्थेवर गुन्हेगारी प्रवृत्ती वाढवण्याचा आरोप व्हायचा, तर आजची अर्थव्यवस्था अशा पिढीला जन्म देत आहे ज्यांचे भविष्य पूर्णपणे टांगणीला लागले आहे. जेव्हा एखाद्या कॉर्पोरेट घराण्याला सरकारकडून काही उदार मदत दिली जाते तेव्हा इतक्या नोकऱ्या निर्माण होतील असे केवळ आकडे फेकून या समस्येला प्रतिसाद देणे मूर्खपणाचे ठरेल. एकूणच जगण्याच्या परिस्थिती आणि भारतीय समाजाचे वैशिष्ट्य असलेल्या सखोल विषमता हे असे घटक आहेत जे अनिश्चिततेचे ढग तयार करतात. जर एका टप्प्यावर भांडवलशाहीवर असामाजिक घटक निर्माण केल्याचा आरोप केला गेला होता, तर आजची अर्थव्यवस्था समाजशास्त्रज्ञांनी ज्याचे वर्णन 'प्रिकॅरिएट' (असुरक्षित वर्ग) असे केले आहे ते निर्माण करते. हे आंदोलन कदाचित या मूळ कारणांपर्यंत पोहोचले नसेल, पण या नैराश्याकडे दुर्लक्ष करणे सर्वांसाठीच घातक ठरेल. आंदोलन शांत झाले तरी परिस्थिती तीच आहे; ती सुधारली नाही, तर भविष्यात दडपता येणार नाहीत असे असंतोषाचे आवाज उठतील. आयुष्य हे असुरक्षित (अनिश्चित) आहे, मग तुम्ही कमी उत्पन्नाच्या गटातील असाल किंवा तथाकथित मध्यमवर्गीय असाल. यावर सरकारने एक राजकीयदृष्ट्या फायदेशीर मलमपट्टी (तात्पुरता उपाय) शोधून काढली आहे - स्वतः पंतप्रधानांनी वापरलेला प्रभावी वाक्प्रचार वापरायचा तर, 'रेवड्या' (मोफत वाटप). मात्र, अशा रेवडी राजकारणात योजनांमुळे स्वाभिमान दुखावला जातो आणि आणि आयुष्याची सततची अनिश्चितता ही नक्कीच मोठ्या घटकांना असंतोषाकडे ढकलून देईल, मग रेवड्यांचा कितीही मुसळधार पाऊस पडला तरीही. सीजेपी (CJP) आंदोलनाने कदाचित सामाजिक असंतोषाच्या या मोठ्या पैलूंना स्पर्श केला नसेल. परंतु सहजासहजी व्याख्या न करता येणाऱ्या या अंतर्निहित नैराश्याकडे दुर्लक्ष करणे हे आपल्या सर्वांच्याच एकत्रित धोक्याचे ठरेल. आंदोलने सध्यापुरती संपली आहेत, परंतु या परिस्थिती अजूनही कायम आहेत आणि जर त्यांच्याकडे लक्ष दिले गेले नाही, तर त्या व्यवस्थेला दडपता येईल त्यापेक्षा जास्त 'कॉकरोच' (कीटक/बंडखोर) निर्माण करतील. शेवटी, पोलिसांची कारवाई म्हणजे सरकारने दिलेल्या राजकीय प्रतिसादाचे प्रत्यक्ष रूप आहे आणि त्यावरून आपल्या आजच्या राजकारणाला काय आजार जडला आहे हे स्पष्ट समजते. 'प्रत्येक आंदोलनाला पोलिसांच्या थोड्याफार अतिरेकी कारवाईला सामोरे जावेच लागते', असे आत्मसंतुष्टपणे आणि वरवरचे विधान करून मोकळे होणे पुरेसे नाही. सोशल मीडियावरील अनेक खाती अतिशय आनंदाने आणि उतावळेपणाने सांगत आहेत की, पोलिसांकडे आंदोलनाचे सर्व व्हिडिओ रेकॉर्डिंग आहेत आणि यात सहभागी झालेल्या प्रत्येक व्यक्तीचा शोध घेऊन त्यांचा छळ केला जाईल. पोलिसांच्या गुप्त आणि लपवून केलेल्या पाठपुराव्याचा पाठबळ असलेली ही धमकी, आपल्या राजकीय व्यवस्थेत नेमके काय चुकते आहे हे उघडे करते. निवडणुकांमधील विजयाचा दाखला देऊन, विजयी झालेले सत्ताधारी स्वतःकडे 'अमर्याद आणि मनमानी अधिकारांचा' (कार्टे ब्लांच) हक्क सांगू लागतात. निव्वळ मतांची मोजणी करून, राजकारणी नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि त्यांची स्वायत्तता हिरावून घेतात. आणि कायदेमंडळातील (संसदेतील किंवा विधानसभेतील) बहुमत नागरिकांच्या तोंडावर फेकून, सरकारे 'संवैधानिक नैतिकता' आणि लोकशाहीतील 'नियमित उत्तरदायित्व' या दोन्ही महत्त्वाच्या गोष्टींना सोयीस्करपणे बगल देतात. थोडक्यात सांगायचे तर, आंदोलनापूर्वीची पार्श्वभूमी, प्रत्यक्ष झालेले आंदोलन आणि आता आंदोलनानंतर समोर येणार परिणाम हे सर्व एकच गोष्ट स्पष्ट करतात. ती म्हणजे या आंदोलनाने देशातील अनेक नागरिकांची मने नक्कीच ढवळून काढली आणि त्यांना विचार करायला लावले, परंतु आपल्या राजकीय नेतृत्वाला मात्र यामुळे काहीच फरक पडलेला नाही. कारण हे सत्ताधारी शासन आंदोलनांमधून काहीही सकारात्मक शिकण्याच्या अजिबात मनस्थितीत नाही; पुढील टप्प्यातील आंदोलने अधिक प्रभावीपणे कशी चिरडायची आणि दडपायची, याचे केवळ तंत्र शिकण्यावरच सरकार ठाम आहे.

**लेखक: सुहास पळशीकर**
**भाषांतर: प्रियदर्शन भवरे**
**साभार: इंडियन एक्सप्रेस, ३१/०७/२०२६**

## पुस्तक हातात घे रे!

तुझ्या हातात
जपमाळ देऊन त्यांनी
तुझ्या प्रश्नांना गप्प केले,
कपाळावर राख फासून
तुझ्या डोक्यातला प्रकाशच
पुसून टाकला.

तुला सांगितले—
हे तुझे कर्म,
ही तुझी जात,
ही तुझी औकात!
आणि तू
शतकानुशतके
त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवून
आपलेच पाय
आपणच बांधत राहिलास.

आता पुरे!
देवाच्या नावाने
तुझ्या पोटात भाकर पडत नसेल,
तर त्या देवापेक्षा
भाकरीसाठी लढणारा हात मोठा आहे.

धर्माच्या नावाने
तुझ्या लेकराला शिक्षण मिळत नसेल,
तर त्या धर्मग्रंथापेक्षा
त्याच्या हातातले पुस्तक मोठे आहे.

तुझ्या झोपडीच्या छपरातून
पावसाचे पाणी टपकत असताना
स्वर्गाच्या गोष्टी सांगणाऱ्यांना
एकदा विचार—
स्वर्ग कुठे आहे रे?
आणि आमच्या घरात
तो कधी येणार आहे?

लिहिता-वाचता येणे
म्हणजे अक्षर ओळखणे नाही;

लिहिता-वाचता येणे म्हणजे
फसवणुकीचा करार वाचणे,
अन्यायाचा हिशेब मांडणे,
इतिहासाच्या पानावर
आपले नाव शोधणे
आणि मिटवलेले नाव
पुन्हा ठळक अक्षरांत लिहिणे.

पुस्तक हातात घेतलेला
गरीब मुलगा
मला क्रांतीची सुरुवात वाटतो.
त्याच्या डोळ्यातले अक्षर
मला मशाल वाटते.
त्याच्या प्रश्नांची आग
मला मंदिरातील हजार घंटांपेक्षा
जास्त पवित्र वाटते.

कारण—
अंधश्रद्धेला
प्रश्नांची भीती असते,
गुलामगिरीला
शिक्षणाची भीती असते,
आणि सत्तेला
जागृत माणसाची!
म्हणून
तुझ्या लेकराला
फक्त देवाचे नाव शिकवू नकोस;
त्याला
प्रश्न विचारायला शिकव.
फक्त प्रार्थना शिकवू नकोस;

त्याला
आपले हक्क वाचायला शिकव.
फक्त नशीब सांगू नकोस;
त्याच्या हातात
लेखणी दे
आणि म्हण—
"तुझे भविष्य
कुणाच्या कपाळावर लिहिलेले नाही;
ते तू स्वतः लिहायचे आहेस!"

धर्म तुला काय देतो
याचा हिशेब करण्यापेक्षा
शिक्षण तुला काय बनवते
हे पाह!
कारण
अक्षर शिकलेला माणूस
एक दिवस
आपल्या गुलामीचे कारण विचारतो;
आणि ज्या दिवशी
गुलाम प्रश्न विचारतो,
त्या दिवशी
सिंहासनाच्या पायाखालची
माती हलायला सुरुवात होते!

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**